म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२२५-
सन १९३९




किंमत ८ आणे ]    भाग २ रा.    [ गं. रा. सान.

# बायकांचीं नवीं गाणीं

६६८२

( भाग २ रा. )

संकाम्य. १०८
२२/१२/१३

रचणार—

श्री. गंगाधर रामचंद्र साने, बी. ए. बी. टी.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ).

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४५०५

REFBK-0004505
REFBK-0004505

१९३१.

किंमत ८ आणे.

—मुद्रक व प्रकाशक—
रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

४४८२
काव्य ९०८६

॥ श्री गोपालकृष्णाय नमः ॥

# प्रास्ताविक चार शब्द.

" बायकांचीं नवीं गाणीं " या पुस्तकाचा पहिला भाग प्रकाशित झाल्या-बरोबर लवकरच चित्रशाळेचे म्यानेजर रा. वासुकाका जोशी यांनीं आम्हांस द्वितीय भाग लिहिण्यास आज्ञा केली. पहिला भाग आमच्या भगिनीवर्गास बराच आवडल्याचें समजल्यावरून आम्हांसही अधिक हुरुप आला व रा. वासु-काकांच्या आज्ञेस त्यांचे बंधु रा. शंकरराव जोशी यांचाही दुजोरा मिळाल्यामुळें आम्ही सहाजीकच दुप्पट जोमानें पुढील भाग लिहिण्याचें कार्यास लागलों, व आज सदर भाग पूर्णपणें छापून आमच्या भगिनींच्या हातीं देण्यास आम्हांस आनंद वाटत आहे. पहिल्या भागाप्रमाणेच ह्याही भागांत ७-८ चित्रें घातलीं असून पदांच्या बहुतेक सर्व चाली आधुनिक आवडीच्याच ठेविल्या आहेत. पौराणिक, ऐतिहासिक, व देशभाक्तपर अशी पदांची वाटणी केली असून पुस्तकाची छपाई व कव्हर पहिल्या भागाप्रमाणेच आकर्षक केलें आहे. एकंदरींत, माझेकडून होतील तितके श्रम करून प्रस्तुत भाग सर्व भगिनी वृंदास प्रिय होईल अशी मीं खटपट केली आहे. ती कितपत साधली आहे हें ठरविण्याचें काम अर्थात् रसिक भगिनींचें आहे. त्यांना तो आवडल्यास मी आपणांस धन्य समजेन. सरते शेवटीं प्रस्तुत भाग लिहिण्यास आम्हांस उत्तेजन दिल्याबद्दल रा. वासुकाका व रा. शंकरराव जोशी यांचे आभार मानून हे प्रास्ताविक चार शब्द पुरे करतों.

५३९ सदाशिव पुणें शहर.
ता. २४-४-३१

सर्वांचा नम्र—
गं. रा. साने.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १ अहिल्योद्धार ... ... | १ |
| २ राम–शबरी ... ... | ३ |
| ३ राधेची प्रार्थना ... ... | ४ |
| ४ यशोदेची तळमळ ! ... | ५ |
| ५ उत्तरेचा विलाप... ... | ६ |
| ६ विदुलाकृत संजयनिषेध ... | ८ |
| ७ जनाबाईचें दळण कांडण... | ९ |
| ८ जिजाईचा शिवाजीस उपदेश. | १० |
| ९ गोपिकाबाईचा विश्वासाबद्दल विलाप ... ... | १२ |
| १० सती रमाबाई !... ... | १३ |
| ११ देवी अहल्याबाई होळकरीण. | १५ |
| १२ चितोडचा जोहार ... | १६ |
| १३ कृष्णाकुमारी ! ... ... | १९ |
| १४ पद्मिनी ... ... ... | २३ |
| १५ हिंदमातेचा हल्ला ... | २७ |
| १६ हिंदमातेची हांक ... | २९ |

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| १७ ताईचा तिळगूळ... ... | ३१ |
| १८ मदिरागृहावर निरोधन करणाऱ्या स्त्रीची प्रार्थना ... | ३१ |
| १९ देशकार्यास निघालेल्या वीरास मातेचा निरोप व आशीर्वाद | ३४ |
| २० खादीपरिधान ... ... | ३५ |
| २१ बिनकराचे मिठाबद्दल स्त्रीची पतीस प्रार्थना ... ... | ३७ |
| २२ विदेशी खेळणी मागणाऱ्या बालकास मातेचा उपदेश | ३८ |
| २३ विदेशी बांगड्या घालणाऱ्या स्त्रीस एका स्वयंसेविकेची प्रार्थना ... ... ... | ३९ |
| २४ चहा ... ... ... | ४० |
| २५ फटाकड्यांवरील संवाद... | ४१ |
| २६ डोहाळे ... ... ... | ४३ |
| २७ प्रभुप्रार्थना ( शेवटची )... | ४५ |

# बायकांचीं नवीं गाणीं

( भाग २ रा. )

६६८२ १०७६ काव्य

## (१) अहिल्योद्धार.

चाल--( संग्राम देवतेला० )

“ रघुविरा ! भक्तिभावें, नमन पदकमला ! ॥ ध्रु० ॥

पतिरूपानें , महेंद्र येई ।
भुलुनी फसवि मला ॥ नमन० ॥ १ ॥

अधःपात मम, देखुनि शापी ।
प्रकुपित पति मजला ॥ नमन० ॥ २ ॥

‘ शिळा होउनि, जडरूपानें ।
पडशिल ’ मुनि वदला ! ॥ नमन० ॥ ३ ॥

शाप देउनी, खवळुनि रागें ।
जाण्या पति सजला ! ॥ नमन० ॥ ४ ॥

चरण धरुनि मी, उश्शापातें ।
मागितलें त्याला ॥ नमन० ॥ ५ ॥

द्रवुनि मानसीं, गद्गदकंठें ।
वदता मग झाला ! ॥ नमन० ॥ ६ ॥

‘ रामराय वानें, पादांगुष्टें ।
स्पर्शिल गे! तुजला ॥ नमन० ॥ ७ ॥

पादस्पर्शें, पावुनि नरतनु ।
होशिल गे ! विमला ! ’ ॥ नमन० ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. ८५०५



पतितपावना !, आजि धन्य तो ।
दिवस पहा आला ! ॥ नमन० ॥ ९ ॥

वानुं किती तव, उपकारांतें ।
केवळ मी अबला ! ॥ नमन० ॥ १० ॥
वर्णुनि गुण तव, अनंत देवा ! ।
वेद पुरा थकला ! ॥ नमन० ॥ ११ ॥
चतुरानन बहु, चतुर वानण्या ।
तोहि परी शिणला ! ॥ नमन० ॥ १२ ॥
सहस्र जिव्हा, थकुनि शेषही ।
शयनतळीं दडला ! ॥ नमन० ॥ १३ ॥
म्हणुनि वंदितें, पुनः पुन्हां मी ।
तुमच्या चरणांला ॥ नमन० ॥ १४ ॥
नमन गोड हें, मानुनी घ्यावें ।
विनती तुम्हांला! " ॥ नमन० ॥ १५ ॥
बोलुनि यापरि, रघुपतिचरणीं ।
माथा ठेवियला! ॥ नमन० ॥ १६ ॥
गाहिंवर दाटुनि, रामप्रभुनें ।
अभय दिलें सतिला ! ॥ नमन० ॥ १७ ॥
मस्तकांवरी, हस्त ठेवुनी ।
शीण तिचा हरिला ! ॥ नमन० ॥ १८ ॥

---

## ( २ ) राम-शबरी.

चाल—( पांडवा सम्राट० )

" अर्पि रामा ! शबरि तुम्हा ।
भक्तिभावें हीं फळें ! ॥ ध्रु० ॥
भिल्लिणीची, जात माझी ।

जगत सगळें, मजसि गांजी ।
दूर लोटी, मज बळें ! ॥ अर्पि० ॥ १ ॥
मजसि ऋषिनें, ठाव दिधला ।
' करी सेवा, ' सदय वदला ।
' राम भेटे, त्यामुळें !' ॥ अर्पि० ॥ २ ॥
यापरी मी, वसत देवा ! ।
अहा ! फळली, आजि सेवा ! ।
दाविलीं तव, पाउलें ! ॥ अर्पि० ॥ ३ ॥
बदरिकेचीं, फळें आणिलीं ।
नीट बघुनी, तुजसि दिधलीं ।
गोडि कळण्या, चाखिलें ! " ॥ अर्पि० ॥ ४ ॥
वदुनि ऐसें, देत रामा ! ।
फळें शबरी, पूर्णकामा ! ।
प्रेम प्रभुला, दाटलें ! ॥ अर्पि० ॥ ५ ॥
भाव भोळा, भिल्लिणीचा ।
देखुनीया, शुद्ध साचा ।
घेउनी त्या, वानिलें ! ॥ अर्पि० ॥ ६ ॥

---

## ( ३ ) राधेची प्रार्थना.

चाल--( अरसिक किति हा० )

सुंदर तें मुख मजला ।
काधिं दृष्टि पडुनि हो, हर्ष मनाला ? ॥ ध्रु० ॥
पावा अधरीं धरिला ।
तो कस्तूरितिलकहि, रेखीत भाला ॥ १ ॥

मकराकृति वलयांला ।
धरि कर्णसंपुटीं, भूषविण्याला ॥ २ ॥
मोर पिसें मुकुटाला ।
माणि कौस्तुभ द्योतवी, त्या हृदयाला ॥ ३ ॥
पीतांबर कासेला ।
त्यावरती रुळते, ती वनमाळा ॥ ४ ॥
जीव अधीर जहाला ।
हें ऐसें दर्शन, नित घेण्याला ! ॥ ५ ॥
' वंदू दुर्मिळतेला ।
कीं निंदूं नकळे मज वेडीला !' ॥ ६ ॥
राधा विनवी हरीला ।
कधिं येशील दर्शन, मज देण्याला ? ॥ ७ ॥

---

[ काळियाचे डोहांत कृष्णानें उडी घेतली ही वार्ता ऐकून– ]

## ( ४ ) यशोदेची तळमळ !

चाल––( कितीतरि राम सुखदाता० )

अहा ! कन्हया ! कधीं माझ्या ।
दिसे डोळां ! ॥ ध्रु० ॥
किती आठवूं, तुला कृष्णा ! ।
जदि माझा, भरुनि आला ।
सुख न त्याला ! ॥ १ ॥
कधीं भेटे ? कुणी सांगा !
धीर माझा, पुरा सुटला ।
पुरा खचला ! ॥ २ ॥

कशी डोहीं, उडी घेशी ?
आणुनि देण्या, विटी सजला ।
मला मुकला ! ॥ ३ ॥
खेळ झाला, तुझा बाळा ! ।
परी शांती न चित्ताला ।
गमे मजला ! ॥ ४ ॥
विष न बाधो, जहरि अहिचें ।
पुन्हां भेटो प्रभो ! मजला ।
विनति तुजला ! ॥ ५ ॥

---

## ( ५ ) उत्तरेचा विलाप.

चाल--( नृपममता रामावरती० )

" मज टाकुनि कांहो गेला ? ।
प्रियनाथा ! मजशीं बोला ! ॥ एकदा ॥ध्रु०॥
अपराध काय मम घडला ? ।
कां असे रुष्ट मनिं झाला ? । मज वदा ॥
कधिं अंतर नाहीं पडलें ।
सेवेंत चित्त वाहियलें । हें सदा ॥
किती प्रेम दाविलें असतां ।
कां आतां सोडुनि जाता ? । दासिला ॥
षण्मास ।
न पुरते खास ।
दिव्य प्रेमास ।
जाहले अपुल्या, लोटले अपुल्या ।
इतुक्यांत कसें हो विटला ? । या जगा ॥ १ ॥

नच योग्य सोडुनि जाणें ।
  निज पत्निस केंविलवाणें ! । या जगीं ॥
या पुढें कसे दिन कंठूं ? ।
  कठिण हा काळ तरि लोटूं ? । मी कसा ? ॥
हें सुंदर मुख दृष्टीला ।
  नच पडेल कवण्या काळा ! । माझिया ॥
      बाबरी ।
      होत क्षणभरीं ।
      तरी सत्वरीं ।
धांवुनी आला, आजवरि आला ।
  कां त्यजिता मग स्नेहाळा ? । आजला ॥ २ ॥
किति शोर्य, धैर्य तें तुमचें ।
  वय सोळा वरुषें साचें । जरि असे ॥
चळचळां अरिस कांपविलें ।
  भयभीत तयांना केलें । किति तरी ॥
लढुनिया थकुनि बहु गेला ।
  म्हणुनि कां बैसली डोळां । झोंप ही ? ॥
      तरि अतां ।
      सत्वरीं उठा ।
      विनवितें नता ।
दासि चरणाला, दासि पदकमला ।
  बोला हो हंसुनी बोला ! । एकदां ॥ ३ ॥
बायांनो, कां मज नेता ? ।
  ओढुनी दूर कां करिता ? । ह्या अशा ॥
लाविली संवय तुम्हींच ।
  कां करितां मग हा जाच ? । मज असा ॥

मी येत नाहिं जा आतां ।
सोडुनिया क्षण नच नाथा । राहवे ।।
मी सती–।
हाय ! परि गती ।
कुठुनि लाभती ? ।
अंशजतनाला, अंशजतनाला ।
पतिमागें तो करण्याला । नशिबिं ये " ।। ४ ।।

बोलुनि यापरी बाला ।
ढळढळा गाळि अश्रूंला ! । त्याक्षणीं ।।
कावरी बावरी झाली ।
मूर्च्छना येउनी पडली ! । भूवरी ।।
पाहुनी शोक सकलांला ।
कितितरि तो दाटुनि आला ! । तेधवां ।।
दगडास ।
वृक्षवेलीस ।
सकल सृष्टीस ।
शोक बहु झाला, शोक बहु झाला ।
करुणार्णव बहु खळबळला ! । किति वदूं ? ।। ५ ।।

---

## ( ६ ) विदुलाकृत संजयनिषेध.

चाल––[ झंपा ]––( असा कारटा॰ )

वदे संजया, कां असा परत येशी ? । युद्ध सांडूनिया केवि बसशी ? ।। ध्रु॰ ।।

समरिं जरि शत्रुला ।
दाविशी पाठ ही ।
' भ्याड ' ह्या पदवीला ।
पात्र होशी ! ॥ वदे० ॥ १ ॥
झगडता मृत्यु जरि ।
तुजासि ठाकूनि ये ।
स्वर्गद्वाराहि तदा ।
मुक्त करिशी ! ॥ वदे० ॥ २ ॥
सतत धूमाहुनी ।
क्षणिक बिजली बरी ।
तत्त्व हृन्मंदिरीं
कां न धरिशी ? ॥ वदे० ॥ ३ ॥
जाइ परतोनिया ।
विजय मिळवोनि ये ।
तोंवरी दावि नच ।
मुख अपेशी ! ॥ वदे० ॥ ४ ॥

---

## ( ७ ) जनाबाईचें दळणकांडण.

चाल--( मज गमत गगन० )

" मज दळणकांडण, सडासंमार्जन,
हेंचि काम देवा ! ।
नामदेव, करुनि पालन,
देति हीच सेवा ! ॥ ध्रु० ॥
साधुसंतसेवारत,

देह हो जरी ।
काय कमति मग त्याला ?
मिळत मोक्ष—मेवा ! ॥ मज० ॥ १ ॥
वृद्धपणीं हाय ! काम,
परि न हो मला ।
धांव म्हणुनि साह्यासी,
करुनि पूर्ण केवा ! ॥ मज० ॥ २ ॥
कोण सांग साह्य हरी,
तुजविना असे ? ।
राख लाज दासीची ।
स्मरुनि भक्तिभावा ! ॥ मज० ॥ ३ ॥
नाम मुखीं सतत जपत,
काम चाललें ।
तूर्ण पूर्ण होण्यासी,
चरणकमल दावा ! ” ॥ मज० ॥ ४ ॥
विनति अशी करुनि जनी,
कार्यि रंगली ।
तोंच धांव घेई प्रभु,
साह्य करित जीवा ! ॥ मज० ॥ ५ ॥

---

## ( ८ ) जिजाईचा शिवाजीस उपदेश.

चाल—( गर गर गिरका० )

तनमनधन हें, अर्पुनि देशा,
सोडिव त्यासि शिवा ! ॥ ध्रु० ॥

बघ मायभूमि तव पंकीं रुतली ।
  परक्यांनीं तिस बहुत छळियली ।
म्हणुनि झडकरी, तवरूपानें ।
  धांवत देव शिवा ! ॥ १ ॥
श्रीरामकृष्ण अवतार कितिक ते ।
  धर्मस्थापण्या झाले होते ।
दंडुनि दुष्टा, रक्षुनि सुष्टा ।
  देती सौख्य जिवा ! ॥ २ ॥
तूं त्यापरि करणी करि रे वेगें ।
  प्रसुप्त जन हे करुनी जागे ।
मोडुनि बेकी, साधुनि एकी ।
  गाजिव कीर्तिरवा ! ॥ ३ ॥
निज धर्म बुडाला, नांव चाललें ।
  वैभव जाउनि दास्यहि आलें ।
काप जाउनी, भोकें उरलीं ।
  हाय ! पहा शिवबा ! ॥ ४ ॥
गोब्राह्मणपालन करण्यासाठीं ।
  जन्मवरी निज करणें आटी ।
गोमातेचे, हंबरडे हे ।
  ऐकुनि धेइ शिवा ! ॥ ५ ॥
या सर्व अनर्था दूर दवडण्या ।
मायभूमिची लाज राखण्या ।
घेइ असिलता झडकरि हातीं ।
  दाखिव शौर्य शिवा ! ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ६६५ ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय १०७६ काव्य ठाणे

———

# ( ९ ) गोपिकाबाईचा विश्वासाबद्दल विलाप.

चाल--( परवशता पाश दैवें० )

हत दैवा ! काय केलें ? नेलें अहा ! बालका ! ॥ ध्रु० ॥

शूर गुणी सुंदर ऐसा,
पुत्र हो पुन्हां कां ? ॥ १ ॥
विश्व मोहवी विश्वास,
नेति सर्व काका ! ॥ २ ॥
अल्पवयहि होतें त्याचें,
शोभवीत अंका ! ॥ ३ ॥
पानिपतीं जाण्यालागीं,
धरित किती हेका ! ॥ ४ ॥
देशकार्य करण्याकरितां,
जाइ वीर बांका ! ॥ ५ ॥
बालवीर समरीं लढुनी,
दिपवि सर्व लोकां ! ॥ ६ ॥
हाय ! परी शौर्याची त्या,
कुठुनि ये शलाका ? ॥ ७ ॥
रात्रदिवस मूर्ती दिसते,
नेत्रिं वसत देखा ! ॥ ८ ॥
कठिण-हृदय मृत्यो ! मजला,
रडविसी असा कां ? ॥ ९ ॥

# ( १० ) सती रमाबाई !

चाल--( कशि येना करुणा० )

" कां म्हणता मजला दूर व्हा? ।
मन पतिविण घेना वैभवा ! ॥ ध्रु० ॥
मी अनाथ अबला जाहलें ! ।
पतिविना हृदय हें दाटलें ! ।
मग कुठून शांती या जिवा ? ॥ कां म्हणता० ॥ १ ॥
मजविना न क्षणही त्या गमे ।
ते पहा म्हणति मज ' ये रमे '
ऐकतें मंजु मधु या रवा ! ॥ कां म्हणता० ॥ २ ॥
किति सुखांत आजवरि राहिलें ।
मृत्यूला न परि तें साहिलें ।
मज पुन्हा त्वरित त्या भेटवा ! ॥ कां० ॥ ३ ॥
क्षय तया न केवळ जाहला ।
मम सुखासही तो लागला ।
झगझगीत विझला ना दिवा ? ॥ कां० ॥ ४ ॥
ती कशी कदर निज दाविली ? ।
अरिमनें थरथरां कापलीं ! ।
आणिलें गृहिं पुन्हा वैभवा ! ॥ कां० ॥ ५ ॥
परि क्षणैक सगळें तें ठरें ? ।
जागृतीस मजला ये रडे ! ।
विनावतें तुम्हां, मज सोडवा ! ॥ कां० ॥ ६ ॥
करुं नका शोक कुणि यापुढें ।
मळवटा भरुनि मज द्या चुडे ।
ही चिता त्वरित हो पेटवा ! ॥ कां० ॥ ७ ॥



मम प्रणाम सकला सांगणें ।
करूं नका कुणीहीं भांडणें ।
एकिनें नांव निज गाजवा ! ॥ कां० ॥ ८ ॥
परि मला न येथें राहवें ।

पतिविना हृदय हें कालवें ।
म्हणुनिया प्रथम मज पोंचवा ! ।। कां० ।। ९ ।।
हे पहा मंत्र द्विज बोलती ।
पतिकडे वळविती जे मती ।
हरित हें वसन मज नेसवा ! ।। कां० ।। १० ।।
आरक्त ज्वाळ हे धावती ।
आरक्त माळ मज द्या हतीं ।
भेटुं द्या पुनरपी त्या धवा !" ।। कां० ।। ११ ।।
यापरी वदुनिया ती सती ।
वंदुनी द्विजांना सन्मती ।
भेटली पुन्हा त्या माधवा ! ।। कां० ।। १२ ।।
स्वर्गांत एकजिव जाहली ! ।
कीर्तिनें पहा किति शोभली ! ।
दाविलें सतीच्या वैभवा ! ।। कां० ।। १३ ।।

---

## ( ११ ) देवी अहल्याबाई होळकरीण.

चाल--( जाके मथुरा० )

देवि अहिल्या स्मरण असावें,
सकलहि भगिनींना ! ।। ध्रु० ।।
होळकरांची सून कुशल बहु,
तोषवि पति-श्वशुरांना ! ।। १ ।।
अल्पवयीं वैधव्य प्राप्त हो,
सहन करित किति जाणा ! ।। २ ।।
श्वशुरामागें राज्य चालवी,
धरुनि मराठी बाणा ! ।। ३ ।।

अबला असुनी भारी झाली,
सबल कितिक शत्रूंना ! ॥ ४ ॥
तारुण्याच्या ऐन भरांतहि,
लक्ष न दे भोगांना ! ॥ ५ ॥
वैभवराशी पदीं लोळतां,
स्पर्श न कधिं करि त्यांना ! ॥ ६ ॥
'भोगविलासी चैन करावी',
वृत्तिहि कधिं मनिं येना ! ॥ ७ ॥
दानधर्म करूनिया तोषवि,
साध्वि कितिक गरिबांना ! ॥ ८ ॥
अमर करोनी नांव आपुलें,
तोषविलें पितरांना ! ॥ ९ ॥
कीर्तिवंत हें चरित्र देखा,
आदर्शहि महिलांना ! ॥ १० ॥

---

## ( १२ ) चितोडचा जोहार.

चाल--( जगीं भक्तासाठीं० )
हा चितोडचा जोहार ।
गाजला दिगंतीं फार ! ॥ ध्रु० ॥
रजपूत रमाणि शीलार्थ ।
जोहारा होती सिद्ध ।
देउनी बळी होमांत ।
राखिलं शील जें प्यार ! ॥ १ ॥



करुनिया चढाई येती ।
' दिन दीन ' यवन ते करिती ।
मदमस्त होउनी वदती ।
"करुं शीलाचा संहार ! " ॥ २ ॥

तैं शूर रजपुती बाणा ।

केशरीवसनपरिधाना—।
करुनिया मांडि निर्वाणा ।
चमकते बिजलि अनिवार! ॥ ३ ॥

परि गडावरति त्या ललना ।
धरुनिया शीलअभिमाना ।
जाणुनी समरनिर्वाणा ।
धरिती न जिवाची कदर! ॥ ४ ॥

धडधडा भडकला अग्नी ।
पेटली चिता चहुकडुनी ।
त्यामाजिं उड्या घेवोनी ।
जाहल्या स्त्रिया त्या अमर! ॥ ५ ॥

खालती गडाच्या चालें ।
अनिवार युद्ध तें उसळें ।
चमकती असिलता भाले ।
घनघोर होई तो समर! ॥ ६ ॥

करुनिया शर्थ परि यवन ।
जिंकिती लढाई जाण ।
मग हर्षित करुनी वदन ।
उघडिती गडाचें द्वार! ॥ ७ ॥

विजयाची धुंदी चढली ।
अरिसेना गड तो चढली ।
'दिन दीन' करित ती सगळी ।
धुंडिती स्त्रिया सुकुमार! ॥ ८ ॥

परि क्षणांत उतरे धुंदी ।
पाहुनि निज अक्कलमंदी ।

जणुं शद्ध जाहले नंदी ।
फजितीस न पारावार ! ॥ ९ ॥
बेचिराख गड तो झाला ।
शत्रुचा माज उतरविला ।
जोहार करुनि जाळियला ।
अरिदर्प मारिला ठार ! ॥ १० ॥

---

## ( १३ ) कृष्णाकुमारी !

**चाल**—( यादवराया० अगर ' वाजल्या दारीं० ' )

किशनकुमारी । दुर्दैव कसें तिज मारी ! ॥ ध्रु० ॥
सौंदर्याची खाणच केवळ ।
स्वरूप तैसें कितितरि उज्ज्वल ।
स्वभाव होता बहुतचि प्रांजल ।
शोभत भारी ! ॥ दुर्दैव० ॥ १ ॥
षोडशवर्षा बाला सुंदर ।
शोभवि निजजनकाचें मंदिर ।
परि तिजसाठीं अपरंपार ।
मारामारी ! ॥ दुर्दैव० ॥ २ ॥
जोधपूरच्या राजालागीं ।
कृष्णेसह करणें सुखभागी ।
परि तो जाई ठरुनि अभागी ।
मृत्युद्वारीं ! ॥ दुर्दैव० ॥ ३ ॥
मानासिंग गादीवर बसला ।
म्हणे, " कुमारी द्या आम्हांला "।

अवमानुनि परि राणा त्याला ।
  करी शिरजोरी ! ॥ दुर्दैव० ॥ ४ ॥

जगत्सिंग जयपूरकराला ।
राण्यानें निज शब्दहि दिधला ।
मानसिंग अपमानित झाला ।
  क्रोध उभारी ! ॥ दुर्दैव० ॥ ५ ॥

शिंदे होळकरांचें साह्य ।
घेउनि सजवी सूड उपाय ।
राणा देखुनि सर्व अपाय ।
  मग्न विचारीं ! ॥ दुर्दैव० ॥ ६ ॥

अजितसिंह मग मंत्री बोले, ।
" संकट राज्यावरि हें आलें ।
मूळ उपटुनी टाकुनि, अपुलें ।
  संकट वारी ! " ॥ दुर्दैव० ॥ ७ ॥

स्पष्ट अधिकतर अमीरखान ।
हृदय जयाचें जणुं पाषाण ।
म्हणे, " मुलीचा घेई प्राण " ।
  तो पेंढारी ! ॥ दुर्दैव० ॥ ८ ॥

नाइलाज जाणुनिया राणा ।
कन्या वधण्या देई आज्ञा ।
कोण कुसुम परि तें कुसकरण्या ।
  करिल तयारी ? ॥ दुर्दैव० ॥ ९ ॥

दौलतसिंगें नकार दिधला ।
' जवान ' मोहुनि मागें सरला ।

वा. क. ८५०४




हातांतुनि खंजीर गळाला ।
रूप निवारी ! ॥ दुर्दैव० ॥ १० ॥
विषप्राशना मग तो प्याला ।
खुद्द आत्यानें आणुनि दिधला ।
मातेच्या तैं घावाचे बसला ।
स्पष्ट जिव्हारीं ! ॥ दुर्दैव० ॥ ११ ॥

रडुनि किती आकांत करी ती ।
लोळत शोकें धरणीवरती ।
शांतपणाची परि जणुं मूर्ती ।
कृष्णकुमारी ! ॥ दुर्दैव० ॥ १२ ॥

प्राशुनि विष, मातेला बोलें, ।
" रडुनि किती तव सुजले डोळे ।
नयनांतुनि हें झरझर चाले ।
संतत वारी ! ॥ दुर्दैव० ॥ १३ ॥

परि ह्या नश्वर देहासाठीं ।
शोकाची कां करिशी आटी ।
अश्रूंची कां व्हावी दाटी ।
नेत्रद्वारीं ! ॥ दुर्दैव० ॥ १४ ॥

शूरकन्यका, शूरहि माता ।
शूरवंश तो अपुला असता ।
अनुचित रडणें सोडुनि आतां ।
घेइ हुशारी !." ॥ दुर्दैव० ॥ १५ ॥

यापरि बोलत असतां वमन-।
होउनि, झालें विषनिर्गमन ।
पुनरपि दिधलें, परि ये जाण ।
पुन्हा बाहेरीं ! ॥ दुर्दैव० ॥ १६ ॥

जलाल विष मग भरुनि आणिला ।
अफुअर्काचा केवळ प्याला ।
घेउनि हातीं परमेशाला ।
नमिन किशोरी ! ॥ दुर्दैव० ॥ १७ ॥

प्राशुनि विष तें जाउनि निजली ।

पुनरपि नाहीं कधिंही उठली ।
निष्ठुर जगतांतुनि या गेली ।
स्वर्गद्वारीं ! ॥ दुर्दैव० ॥ १८ ॥

पेंचांतुनि जनका सोडविलें ।
आत्मार्पण निज पुरतें केलें ।
कीर्तिरवानें अंबर भरलें ।
दिशांना चारी ! ॥ दुर्दैव० ॥ १९ ॥

सौंदर्याची किंमत नाहीं ।
प्राणांचीही परवा नाहीं ।
राज्य राखणें हींच कमाई ।
शिकवि कुमारी ! ॥ दुर्दैव० ॥ २० ॥

---

## १४ पद्मिनी.

चाल—( पुन्हा हा नाचवा० )

पद्मिनीरूपकांतीचा । पवाडा ऐकणें साचा ! ॥ ध्रु० ॥

कन्यका हमिरसिंगाची ।
सिंहलद्वीपराजाची ।
चितोडीं मान तिस वधुचा ! ॥ पवाडा० ॥ १ ॥

दिली तिस भीमसिंगाला ।
पाहुनी धैर्य–शौर्याला ।
सोहळा होइ सौख्याचा ! ॥ पवाडा० ॥ २ ॥

यापरी कांहिं दिन जातां ।
प्रमोदीं उभयतां असतां ।
पातला काळ कष्टाचा ! ॥ पवाडा० ॥ ३ ॥

ऐकुनी दिव्य लावण्य ।
येतसे खिलजि धांवून ।
गडा दे फांस वेढ्याचा ! ॥ पवाडा० ॥ ४ ॥
यापरी कितिक दिन गेले ।
तयासीं यश न मुळें आलें ।
बोलला दीन मग वाचा ! ॥ पवाडा० ॥ ५ ॥
" पाहुनी एकदां तिजला ।
जियेला जीव हा भुलला ।
धरिन मी मार्ग दिल्लीचा ! ॥ पवाडा० ॥ ६ ॥
म्हणोनी एकदां दावा ।
सांडिला यापुढें दावा । "
धाडिला शब्द विनतीचा ! ॥ पवाडा० ॥ ७ ॥
" दर्पणीं दर्शना घेणें ।
रुचे तर येउनी जाणें । "
शब्द हा भीमसिंगाचा ! ॥ पवाडा० ॥ ८ ॥
निरोपा ऐकुनी खिलजी ।
' काकदीलागि हो राजी ' ।
योजुनी डाव कोल्ह्याचा ! ॥ पवाडा० ॥ ९ ॥
दर्शनें थक्क तो झाला ।
बिजालिचा भास जणुं गमला ।
बळावे लोभ त्या मनिंचा ! ॥ पवाडा० ॥ १० ॥
गडाच्या येत बाहेरीं ।
सवें त्या भीमजी स्वारी ।
घालि त्या फास अटकेचा ! ॥ पवाडा० ॥ ११ ॥
" पद्मिनी प्राप्त होईतों ।

तुम्हासी कैद अम्हि करितों ।
घडूं द्या लाभ त्या परिचा !" ॥ पवाडा० ॥१२॥

ऐकुनी शब्द . .लर्जीचें ।
सळसळे रक्त राण्याचें ।
परी ये भोग कैदेचा ! ॥ पवाडा० ॥ १३ ॥

पाद्मिनी चतुर बहु होती ।
निरोपा धाडि ती सुमती ।
योजुनी डाव मौजेचा ! ॥ पवाडा० ॥ १४ ॥

ठकासी ठक न जरि व्हावें ।
अपेशा पदरिं तरि घ्यावें ।
विदित हा नियम नीतीचा ! ॥ पवाडा० ॥१५॥

वंचका फसविण्या वदली !
" येतसे भेटण्या जवळी ।
राखुनी डौल राणीचा ! ॥ " पवाडा० ॥ १६ ॥

सातशें पालख्या सजल्या ।
सातशें दासि जणुं बसल्या ।
परी तो थाट विजयाचा ! ॥ पवाडा० ॥ १७ ॥

सातशें भोइही आले ।
शिपाई गुप्त ते सजले ।
जिरविण्या गर्व तो अरिचा ! ॥ पवाडा० ॥१८॥

चाललें गुप्त तें सैन्य ।
कांपण्या शत्रुचें रान ।
धरोनी मार्ग छावणिचा ! ॥ पवाडा० ॥ १९ ॥

पतीला भेटण्या विनती ।

जाहली मान्य ती पुरती ।
काळ तो दीड घटकेचा ! ॥ पवाडा० ॥ २० ॥
खरी ना पद्मिनी गेली ।
अवाई छान पसरविली ।
सुलभ हो मार्ग राण्याचा ! ॥ पवाडा० ॥ २१ ॥
रिकाम्या पालख्या कांहीं ।
चितोडा परतल्या पाहीं ।
त्यांत ये नाथ त्या सतिचा ! ॥ पवाडा० ॥२२॥
हर्षली पाहुनी नाथा ।
ठेविला तत्पदीं माथा ।
समय तो त्यास मोदाचा ! ॥ पवाडा० ॥ २३ ॥
परी त्या छावणीमाजीं ।
होउनी आधर तो खिलजी ।
धाडितो शब्द चौकशिचा ! ॥ पवाडा० ॥ २४ ॥
क्षणार्धीं माजली झुंज ।
उतरण्या शत्रुचा माज ।
शब्द तो होत खड्गांचा ! ॥ पवाडा० ॥ २५ ॥
गडाच्या दारिं दंगलिचा ।
जाहला कळस तो साचा ।
रचियला होम प्राणांचा ! ॥ पवाडा० ॥ २६ ॥
' * बादलं ' अर्पुनी प्राण ।
दाविलें दिव्य निर्वाण ।
धन्य त्या जीव पोराचा ! ॥ पवाडा० ॥ २७ ॥
* ' गोन्हा ' त्या सवें गेला ।

* ' बादल ' व ' गोन्हा ' हे पद्मिनीच्या माहेराकडचे सरदार. ' बादल ' तर अवघा बारा वर्षांचा वीर होता !

झगडुनी पूर्ण स्वर्गाला ।
अडविला मार्ग सैन्याचा ! ॥ पवाडा० ॥ २८ ॥

यापरी खजिल होवोनी ।
जातसे खिलजि निजभुवनीं ।
समय ये पूर्ण फजिताचा ! ॥ पवाडा० ॥ २९ ॥

सतीनें विजय होवोनी ।
युक्तिचा डाव जिंकोनी ।
दाविला मार्ग सौख्याचा ! ॥ पवाडा० ॥ ३० ॥

---

## ( १५ ) हिंदमातेचा हलवा.

बाळांनो घ्यावा,
तुम्हीं हा मधूर तिळगूळ ।
याचे सेवन कीं,
देतसे स्वतंत्रता सुफळ ॥ ध्रु० ॥

असहकारितेच्या,
शेगडीवरतीं हलकडई ।
स्वार्थत्यागाचे,
तिळहि ते घातियले पाही ॥ १ ॥

राष्ट्रप्रेमाच्या ,
शर्करारस पातांतून ।
तुम्हास्तवचि पाही,
घातला पाक किती झटुन ॥ २ ॥

किंचियश हर्ष,
येतसे कांटा त्यावरती ।

करुनि पूर्ण ऐसा,
ठेविला सुंदरशा पावीं ॥ ३ ॥

अर्पण हो करितें,
तुम्हा मी बहु वात्सल्यानं ।
" राष्ट्रकार्यसिद्धी,
करा, जा " सांगे प्रेमानें ॥ ४ ॥

वंदुनि गांधीला ।
तसें त्या श्रीपरमेशाला ।
कार्या लागोनी,
पावा स्वराज्य ध्येयाला ! ॥ ५ ॥

मातेनें दिधला,
तोच तिळगूळ तुम्ही घ्यावा ।
मित्रांना द्यावा,
टाकुनी सर्व वैर भावा ॥ ६ ॥

आपसांत फूट,
करीते अंतिं राष्ट्रघात ।
या तत्वालागीं,
ठेवणें सदैव हृदयांत ! ॥ ७ ॥

स्नेहभाव धरुनी,
सर्वही कार्य करा अपुलें ।
म्हणजे ईशकृपें,
पूर्ण यश हाता येइ भलें ! ॥ ८ ॥

———

# ( १६ ) हिंदमातेची हांक.

चाल—( बाळा जो जो रे० )

धांवा धांवा हो । पुत्रांनो ।
भारतसंतानांनो ! ॥ ध्रु० ॥

आजवरी छाळिलें । बहुतांनीं ।
परि रक्षित पुत्रांनीं ॥ १ ॥

रामें संहरिलें । दैत्यकुळ ।
केला हलका भार ! ॥ २ ॥

कृष्णें मारियलें । कंसाला ।
तैसें त्या शिशुपाला ! ॥ ३ ॥

दुर्योधन मत्त । धनमत्त ।
मारुनि सौख्या देत ! ॥ ४ ॥

पृथ्वीराज खरा । वीर पुरा ।
चालवितो समशेर ! ॥ ५ ॥

मजसी सुखवाया । बहु लढला ।
यवनगर्व कीं चुरिला ! ॥ ६

मोंगलशाहींत । शिवराणा ।
मदर्थ करि झगड्यांना ! ॥ ७

माझा प्रिय तान्हा । सिंहगडीं ।
दास्यशृंखला तोडी ! ॥ ८ ॥

पावनखिंडींत । तो बाजी ।
मदर्थ कीं लढला जी ! ॥ ९ ॥

परवा परवाही । मम ' बाळ ' ।
झगडुनि आंग्ला काळ !–॥ १० ॥

झाला होता हो ! परि हाय ! ।
गेला करूं मी काय ? ॥ ११ ॥

दुसरा वीर पुरा । तो गांधी ।
परि त्या सांप्रत बंदी ! ॥ १२ ॥

मजला बहु छळिती । परकीय ।
तैसे कितिक स्वकीय ! ॥ १३ ॥

धावुनि या कोणी । मजलागीं ।
हाय ! कसे हतभागी–॥ १४ ॥

दिवस पहा आले । अब्रूचे ।
धिंडवडे उडण्याचे ! ॥ १५ ॥

पौरुष कीं गेलें । विलयाला ? ।
कां न कंकणा ल्याला ? ॥ १६ ॥

आयाबहिणींची लाज धरा ।
अब्रू सांभाळा ! ॥ १७ ॥

माझ्या बाळांनो । वीरांनो ! ॥
आर्यश्रेष्ठकुलजांनो ! ॥ १८ ॥

तेजस्वी शस्त्रं । घेउनिया ।
या बंधन तोडाया ! ॥ १९ ॥

लाभो तुम्हांला । हा छंद ।
पुरवो तो गोविंद ! ॥ २० ॥

———

# ताईचा तिळगूळ.

चाल--( चंद्रकांत राजाची० )

ममप्रिय बंधो ! पावतसे तव प्रेमाचा हलवा ।
काव्यरसाचा परि चाखावा मधुर तुवा मेवा ! ॥ १ ॥
' तिळ तिळ ' तुटलें, हृदय जरी हें, दीन जना बघुनी ।
दुःखनिवारण उल्हास वरी, राही गुळ बनुनी ! ॥ २ ॥
तरिच खरा मधुमधुर असा तो होई ' तिळगूळ ' ।
ज्यांत न उरलें किंचिन्मात्रहि स्वार्थाचें मूळ ! ॥ ३ ॥
" हिंदूंचें हिंदुस्थानहि तें सदैव राखावें ।
आर्यावर्तीं आर्य जनांनीं स्वराज्य भोगावें ॥ ४ ॥
सुहिंदमाता दास्यशृंखलीं दुःखमग्न झाली ।
आठवुनी निजवैभव खळखळ अश्रूंतें ढाळी ! ॥ ५ ॥
सोन्याची तलवार हृदीं कां नच पाडी क्षत तें ? ।
सुवर्ण पात्रांतिल विष जीवा देई मृत्यूतें ! ॥ ६ ॥
मातृभक्त हृदयासी यास्तव करुनि झणीं जागे ।
गरुडगतीनें गरुडापरि तन्मुक्तासी लागे !" ॥ ७ ॥
विचार ऐसा सर्व देशभर सकलांनीं हलवा ।
' हलवा ' होइल तरिच खरा तो, सौख्यातें मिरवा ! ॥८॥

---

# (१८) मदिरागृहावर निरोधन करणाऱ्या स्त्रीची प्रार्थना.

चाल--( धनराशी० )

मदिरेचा प्याला । पाहुनी येसी ।
आजि कां जिवा ? । मम बांधवा ! ॥ मदिरे० ॥ ध्रु० ॥




शुक्राचार्य पहा फसले ।
कचरक्षा बहु सेवियले ।
धुंद होउनी किति भ्रमले ।
मती भ्रष्टली ।

विद्या हरली ।
तेधवा, यशवैभवा ! ॥ मदिरे० ॥ १ ॥
श्रीसंभाजी बहु योद्धा ।
परि दारूचा किति बंदा ।
घेई मदिरेच्या छंदा ।
संगमश्वरीं ।
मृत्युद्वारीं ।
पाववा, म्हणती जिवा ! ॥ मदिरे० ॥ २ ॥
देह, वित्त, किति ही नाशी ।
नाश किती हो धर्मासी ।
नीती नाहीं मुळीं तिजशीं ।
अशी भयंकर ।
मदिरा सुंदर ।
दूर व्हा, हिस घालवा ! ॥ मदिरे० ॥ ३ ॥
अजुनि तरी सावध होई ।
राक्षसिणीला ह्या हरवी ।
हद्दपार तिस तूं करवी ।
तरी स्वदेशा ।
येई सुदशा ।
मेळवा, मग वैभवा ! ॥ मदिरे० ॥ ४ ॥
विनति करी तुजला भगिनी ।
जोडुनिया आपुले पाणी ।
ऐके वाणी निर्वाणी ।
सोड ही पुरी ।
नाश नातरी !
बांधवा, ऐके रवा ! ॥ मदिरे० ॥ ५ ॥

# ( १९ ) देशकार्यास निघालेल्या वीरास— मातेचा निरोप व आशीर्वाद.



चालः—( दत्त गुरुला० )

देशकार्या जाइ बाळा ! ।
यश तुज प्रभु तो पूर्ण देउंदे ।
हीच विनंती मम घननीळा ! ॥ देश० ॥ ध्रु० ॥

अर्पुनि तनमनधनही अपुलें ।
नांव गाजवी त्वरित चांगलें ।
देशभक्तिचा लागो चाळा ! ॥ देश० ॥ १ ॥

हृदय भरुनि बघ किंति हें येतें ।
तरि आवरुनी त्यातें धरितें ।
आशीर्वच मम सदैव तुजला ! ॥ देश० ॥ २ ॥

मायभूमि ही दीन जाहली ।
पारतंत्र्यपंकांत बुडाली ।
म्हणुनि सोडवी झटुनी तिजला ! ॥ देश० ॥ ३ ॥

एकुलता जरि सुत तूं मातें ।
तरि देशाच्या कार्यि वाहतें ।
कां नच दिधले अधिक दयाळा ? ॥ देश० ॥ ४ ॥

---

## ( २० ) खादीपरिधान.

चालः—( मुद्रिके, सांग कुठें श्रीराम ? )

भगिनी ! खादि करी परिधान ! ॥ ध्रु० ॥

खादि वापरा, सूतहि काढा ।
सांगे ' मोहन ' जाण ! ॥ भगिनी० ॥ १ ॥

गरिबांलागीं अन्न मिळे गे ।
वाचुनि त्यांचे प्राण ! ॥ भगिनी० ॥ २ ॥
गरगर गिरका, घेई चरका ।
मारुनि मधुरा ताण ! ॥ भगिनी० ॥ ३ ॥
गोड लकेरी किति ही त्याची ।
सदैव चाले जाण ! ॥ भगिनी० ॥ ४ ॥



' चरका-संगित ' ऐकुनिया गे ।
विसरुनि जाई भान ! ॥ भगिनी० ॥ ५ ॥
कृष्णप्रभूचें चक्राहि दुसरें ।
भासें मजला जाण ! ॥ भगिनी० ॥ ६ ॥
दुष्ट दंडिले कितिक तयानें ।
तेवि करिल हें छान ! ॥ भगिनी० ॥ ७ ॥

चरका देई अरिला चरका ।
मांडि पुरें निर्वाण ! ॥ भगिनी० ॥ ८ ॥
स्वराज्यसाधन अचुक एक हें ।
वदती गांधि महान् ! ॥ भगिनी० ॥ ९ ॥
हौस विदेशी तुजला किति ही ।
कां होशी बेभान ? ॥ भगिनी० ॥ १० ॥
नाहिं तुला कां मायभूमिचा ।
तिळभरही अभिमान ? ॥ भगिनी ॥ ११ ॥
या पुढतीं तरी राखावा गे ।
निज देशाचा मान ! ॥ भगिनी० ॥ १२ ॥
विनति शेवटीं एकच तुजला ।
वच हें मानि प्रमाण ! ॥ भगिनी० ॥ १३ ॥

---

## ( २१ ) विनकराचें मिठाबद्दल स्त्रीची पतीस प्रार्थना.

चाल—( वद जाउं कुणाला शरण० )

सरकार बसावितें करा, म्हणुनि नच करा,
करातें पुढतीं ।
स्वीकरा न असली माती ! ॥ ध्रु० ॥
दास्यांत बुडवुनी खास, कसा गळफांस
लाविला बत्रणें ।
प्रियकरा ! तुम्ही तो त्याजिणें ! ॥ १ ॥

करयुक्त असें हें मीठ, किती वाईट,
जाचतें मतिला ।
जाळितें तेवि हृदयाला ! ॥ २ ॥
हा दर्या उसळे भला, तीन बाजुला,
क्षार किती देई ।
प्रभुजिची कशी नवलाई ! ॥ ३ ॥
देवाचिच इच्छा दिसे, सत्य वदतसें,
मीठ लाभावें ।
मनमुराद मोफत खावें ! ४ ॥
करण्यास करांतुनि मुक्त, सांडिलें रक्त,
कितिक वीरांनीं ।
ऐकिलें नाहिं कां गानीं ? ॥ ५ ॥
करकरुनी कारावास, घडे कितिकांस,
याच हो पायीं ।
काशि स्फूर्ति तुम्हा नच येई ? ॥ ६ ॥
शेवटीं जोडुनी करा, विनवि प्रियकरा ! ॥
करा, वच मान्य ।
व्हा देशभक्तिनें धन्य !॥ ७ ॥

---

## ( २२ ) विदेशी खेळणी मागणाऱ्या बालकास मातेचा उपदेश.

चाल--( सत्य वदे वचनाला० )
कां धरिशी हा हट्टहि बाळा ! ।
परकी खेळांचा कां चाळा ? ॥ ध्रु० ॥

हें दुसरें घे पूर्ण स्वदेशी ।
मुरडुं नको तव नाक तयाला ! ॥ परकी० ॥ १ ॥
मायभूमि तव दीन जहाली ।
साह्य नको कां करणें तिजला ? ॥ परकी० ॥ २ ॥
जन्मभूमि तव माता आहे ।
माझ्याहुनिही थोर प्रेमळा ! ॥ परकी० ॥ ३ ॥
माझ्यावरि तव प्रेम असे ना ? ।
तिजवरि कां मग ऐसा रुसला ? ॥ परकी० ॥४ ॥
परक्यांनीं तिस बद्ध बांधियलें ।
झडकरि तोडी दास्यशृंखला ! परकी ० ॥ ५ ॥
माझ्याहुनिही थोर मायभू ।
येऊं दे तुज लवहि उमाळा ! ॥ परकी० ॥ ६ ॥
जरि न सोडिशी हट्टहि अपुला ।
तरि मग तुजशीं धरिन अबोला ! ॥ परकी० ॥७॥

---

## ( २३ ) विदेशी बांगड्या घालणाऱ्या स्त्रीस एका स्वयंसेविकेची प्रार्थना !

चाल—( पांडवा सम्राट० )

कां विदेशी कंकणानें,
भूषविता या करा ? ॥ ध्रु० ॥
' बिजलिबत्ती ' केवि रुचते ? ।
जाळि देशा मनिं न येतें ।
आग आणिता कां घरा ? ॥ १ ॥

‘ सायकल’ही करीं भरीता ।
देशपाशा घट्ट करिता ।
नाहीं धंदा हा बरा ! ॥ २ ॥
‘ रेशमी ’ ची आवड वाटे ।
जरि स्वदेशा रुताति कांटे ।
कशि न चिंता ही करा ? ॥ ३ ॥
घरीं बसुनी देशकार्य ।
सहजरूपें द्या सहाय ।
‘ काळि ’ घाला ‘ कारला ’ ! ॥ ४ ॥
बंधु अपुले आज मरती ।
कार्य करण्या किती झटती ।
तुम्हिहि देशा उद्धरा ! ॥ ५ ॥

---

## ( २४ ) चहा.

चाल—( आनंदकंद० )

ऐका मदीय बोला । स्पर्शू नका चहाला ! ॥ ध्रु० ॥
पकडोनि जीभ अपुली ।
हा नित्य देश जाळी ।
मग कोण वालि बोला ? ॥ स्पर्शू० ॥ १ ॥
आबालवृद्ध घेती ।
वाटे मुळीं न खंती ।
नरनारि भेद सरला ! ॥ स्पर्शू० ॥ २ ॥
टाकोनि दुग्ध देशी ।

रुचतो चहा विदेशी ! ।
किति हीन काळ आला ! ॥ स्पर्शूं० ॥ ३ ॥
सोडोनि अमृतातें ।
रुचि भ्रष्ट केवि होते ।
घ्या दुग्धप्राशनाला ! ॥ स्पर्शूं० ॥ ४ ॥
निज पूर्वजांसि काय ।
जगण्या चहा उपाय ? ।
मग आज कां वरीला ? ॥ स्पर्शूं० ॥ ५ ॥
द्रव्यौघ नित्य वाहे ।
परदेश पूर्ण पाहे ।
निज देश दीन झाला ! ॥ स्पर्शूं० ॥ ६ ॥
स्वातंत्र्य-संगरांत ।
नच हें कुणास उचित ! ।
म्हणुनी त्यजा तयाला ! ॥ स्पर्शूं० ॥ ७ ॥
विनती तुम्हांस भगिनी ।
जोडोनि नित्य पाणी ।
द्या मान ह्या वचाला ! ॥ स्पर्शूं० ॥ ८ ॥

---

## (२५) फटाकड्यांवरील संवाद.

( चाल--दिंडी वृत्ताची. )

ताई:— पहा दिपवाळी आज कशी आली ।
किती हर्षित हीं बालकें जहालीं ! ।
आणुनि आम्हा देशील ना फटाके? ।
बोल दादा ! कां चित्त तुझें धाकें? ॥ १ ॥

दादाः—  काय सांगूं तुज, दुःख वाटतें जें ।
बघुनि परदेशी चित्त उलें माझें ।
फटाक्यांच्या दारुनें आग देशा ।
हाय ! लागोनी, नष्ट होइ आशा ! ॥ २ ॥

प्रती वरुषाला लागतसे आग ।
कधीं नकळे येईल जना जाग ।
कसें ताई ! तुजलागिं हें कळावें ? ।
फटाक्यानें कां मुदित तुम्हि न व्हावें ? ॥३॥

ताईः—  तसें नाहीं; जाहला बोध आतां ।
कधिं न देशाला अम्ही करूं बाधा ।
काय आम्हांला कळत मुळीं नाहीं ।
वीर झटती तें नित्य देशकार्यीं ? ॥ ४ ॥

विदेशीला मी स्पर्श नच करीन ।
स्वदेशीची घे शपथ पूर्ण जाण ।
पहा कथितें बालका, अतां नीट ।
बालबोधाचे शब्द ऐक स्पष्ट ! ॥ ५ ॥

( बालकांना– )–" अतां बाळांनो, लक्ष तुम्हीं द्यावें ।
काय म्हणतें मी चित्तिं हें धरावें ।
शब्द गांधींचे ऐकणार काय ? । "

मुलेंः—  होय ! ताई, वद 'गांधिजिकी जय !' ॥ ६ ॥

ताईः—  ठीक, ऐका तर, गांधि वदति बोला ।
" फटाक्यांना तूं घेउं नको बाळा ! "

मुलेंः—  ठीक, आम्ही नच घेऊं गे ! फटाके ।
गांधिशब्दांचें तेज किती फाकें ! ॥ ७ ॥

'गांधिजीकी जय ! गांधिजीकी जय !'
नाचुं आम्ही तालांत, हेंच कार्य ! ।
काढुं फेरी दररोज कीं सकाळीं ।
शब्द गांधींचे फिरवुं अळोआळीं ! ॥ ८ ॥

नाहिं आम्हांला भय जगीं कुणाचें ।
प्राण देण्यासी सिद्ध असों साचे ।
फटाक्यांच्या फुसक्याच तिथें गप्पा ! ।
गांधि शब्दांचा मार्ग किती सोपा ! ॥ ९ ॥

दादाः—— धन्य ताई तूं, धन्य तुम्ही बाळें ! ।
किती हर्षाचे येत मज उमाळे ! ।
देव तुम्हांला आयु विपुल देवो ! ।
देशसेवा तो नित्य अशी घेवो ! ॥ १० ॥

---

## एका देशभक्त स्त्रीचे

# ( २६ ) डोहाळे.

चाल--( महाराष्ट्राच्या उदयाला० )

"मज वाटे राज्य करावें ।
गरिबासि नित्य सुखवावें ! ॥ ध्रु० ॥

धर्माचें रक्षण पूर्ण ।
दुष्टाचें करुनी चूर्ण ।
सज्जनास प्रतिपाळावें ! ॥ गरिबासि० ॥ १ ॥

अबलांच्या शीलासाठीं ।



होउनिया कीं जगजेठी ।
धांवुनी त्वरित बहु यावें ! ॥ गरिबासि० ॥ २ ॥
गोरक्षण करणें उचित ।

म्हणुनिया बनुनि भगवंत ।
साह्यास पुन्हां धावावें ! ॥ गरि० ॥ ३ ॥

हा देश जाहला दीन ।
दुष्टांचें माजें रान ।
निवडुनी तया काढावें ! ॥ गरि० ॥ ४ ॥

दास्यांत बुडाला देश ।
परक्यांचा पडला पाश ।
तोडुनी तया टाकावें ! ॥ गरि० ॥ ५ ॥

आनंद माय देशांत ।
पसरुनिया द्यावा नित्य ।
मग स्वानंदें डोलावें ! ॥ गरि० ॥ ६ ॥

---

## ( २७ ) प्रभुप्रार्थना ! ( शेवटची )

चाल--( मैंतो दासी० )

देवा ! दावी दया ! ।
दासासी ह्या अपुल्या ॥ देवा० ॥ ध्रु० ॥

पुराण इतिहासांतिल चरितें
कथुनि, मार्ग शिकवाया ।
ज्ञानप्राप्तिचा स्त्रीवर्गास्तव
केला, यश दे राया ! ॥ देवा० ॥ १ ॥

देशभक्तिचा मार्गहि तैसा ।
दाखविला मीं सदया ।

दोन भाग यापरी जाहले,
गानें बोध उतराया ! ॥ देवा० ॥ २ ॥
अल्पतरी भगिनींची उन्नति
साधा, हरुनी माया ।
हीच विनंती वंदुनि करितों,
प्रभुजी ! तव चरणा या ! ॥ देवा० ॥ ३ ॥

REFBK-0004505

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ शुभं भवतु ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४४५०५